admn 24-25

MCAER
कृषि परिषद

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.
ई मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८
संकेतस्थळ- www.mcaer.org

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२५ २८/८७२/ ३५६३ दि. ५ डिसेंबर,२०२४

## परिपत्रक

**विषयः- पदव्युत्तर प्रवेश प्रक्रिया २०२४-२५**
**रिक्त जागा भरण्यासाठी कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी दि. १०/१२/२०२४ रोजी 'जागेवरील प्रवेश फेरी' राबविणेबाबत.**

सन २०२४-२५ हया शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दि.१८/०९/२०२४ ते २५/१०/२०२४ हया कालावधीत कृषी परिषदेकडून राबविण्यात आली. भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली (भाकृअप) यांच्याकडील प्रवेश प्रक्रिया दि.०८ नोव्हेंबर,२०२४ पर्यंत राबविण्यात आलेली आहे. कृषी परिषदेच्या दि.२६/१२/२०२३ रोजीच्या ११३ व्या बैठकीमध्ये रिक्त जागा भरण्याविषयी सूचित करण्यात आलेले आहे. करिता चारही कृषी विद्यापीठांतर्गत सध्या रिक्त असलेल्या जागांचाही तपशील प्राप्त करून घेण्यात आलेला आहे.

यास अनुसरून सन २०२४-२५ हया शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, **दि.१०/१२/२०२४ रोजी राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी 'जागेवरील प्रवेश फेरी' राबविण्यात येणार आहे.** सदर प्रवेश फेरीद्वारे कृषी परिषदस्तरावर यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत रिक्त जागा तसेच भाकृअपच्या कोटयातील रिक्त जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. जागेवरील प्रवेश फेरीद्वारे भरावयाच्या जागांचा तपशील **https://pg.agrimcaer.in** हया संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सन २०२४-२५ हया शैक्षणिक वर्षाच्या अंतिम गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार 'जागेवरील प्रवेश फेरी'करिता पात्र असतील. तसेच राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत सध्या प्रवेशित उमेदवारास जागेवरील प्रवेश फेरीमध्ये प्रविष्ठ व्हावयाचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा सध्याचा प्रवेश रद्द केल्यास त्यांना जागेवरील प्रवेश फेरीमध्ये प्रविष्ठ होता येईल. अशा पात्र उमेदवारांनी तसेच चारही कृषी विद्यापीठांतील प्रवेश प्रक्रियेशी संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पुढील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन **दि. १०/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ११.०० या कालावधीत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी संबंधित कृषी विद्यापीठाच्या मुख्यालयी उपस्थित राहावे.

(२) **सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.**

(३) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **https://pg.agrimcaer.in** हया संकेतस्थळावर **नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावरील संबंधित कृषी विद्यापीठाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध असेल.

(४) पात्र उमेदवारांचा गुणानुक्रम व प्रवर्ग विचारात घेऊन रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात येतील. संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील रूपांतराच्या कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर प्रवेश देण्यात येतील.

(५) उमेदवाराची योग्य ती कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क स्वीकारण्यासाठी प्रत्येक कृषी विद्यापीठाने योग्य ती व्यवस्था करावी.

(६) **या प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना कोणत्याहीप्रकारची शिष्यवृत्ती / शुल्काची प्रतिपूर्ती मिळणार नाही.**

(रावसाहेब भोगडे)
**महासंचालक**

प्रत कार्यवाहीसाठीः-

१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

३) मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे

यांना सूचित करण्यात येते की, उक्त परिपत्रकाबाबत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना, महाविद्यालयांना भ्रमणध्वनी / ई-मेल संदेशाद्वारे अवगत करण्यात यावे. तसेच महाविद्यालयांच्या लॉगइनमध्ये तसेच संकेतस्थळावर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.